पत्रांक १४६ श्री १६९६ भाद्रपद

यादी. सरकारचे जाबसाल राजश्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा यांज-पासून करार करून घ्यावयाचे. सुा खमस सबैन मया व अलफ.

सरकारचे नजरेचा ऐवज रुा
७५०००१ ऐन सरकार
१००००० राजश्री सखाराम भगवंत
१००००० राजश्री बाळाजी जनार्दन
५०००० हरी बल्लाळ.

---

१०००००१

दहालक्ष एक रुपया करार केला असे. सालमजकुरीं फौजेचा पेंच भारी. याजकरितां पेस्तर सालापासून दरसाल दोन लक्ष रुा मार्गशीर्ष शुा १ पुण्यास पोता करीत जावें. पांच वर्षांत झाडा करून द्यावा. येणेंप्रों करार.

बालापूर व वासीमचें कापड दर-साल सरकारांत द्यावें, ऐसा करार पेशर्जी जाहला आहे. त्यापासोन रा-हिलें असेल तें सालमजकुर दसरि-यास पुण्यास पावतें करावें. पुढें दर-साल देत जावें. येणेंप्रमाणें करार.

नबाब निजामअल्लीखांबाहादर या-जकडील माहालांत तुह्मांकडील घांस-दाण्याचा उपद्रव फार लागतो. याचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. त्यास तुह्मीं आपला मातबर माणूस आह्मां समागमें द्यावा. नबाबाकडील कार-भारी येतील. सरकारांतून मामूल पाहून तह करून देऊं त्याप्रों ऐ-वज घ्यावा. जाजती उपद्रव देऊं नये. येणेंप्रों.

पेशर्जी थेऊरचे मुक्कामीं ऐवजाचा करार आहे. त्यापैकीं वसूल पडोन बाकी ऐवज राहिला असेल तो झा-डोन दसरियास पुण्यास पावता क-रावा येणेंप्रों.

सरकारचे महाल गंगथडी वगैरे कुल आहेत. त्यास सालमजकूरपा-सोन घांसदाणा घेऊं नये, उपद्रव लाऊं नये—येणेंप्रों.

पा बालापुराकडे सरकारचा बाकी ऐवज येणें. त्याचें पत्र तुमचें सरकारांत आहे. त्याप्रों ऐवज सा-लमजकूर दसरियास पुण्यांत पावता करावा येणेंप्रों.

सरकारच्या लक्षाशिवाय दुसरें लक्ष शपतपूर्वक धरूं नये. प्रयोजन लागल्यास आपणांस बलाऊं पा. त्या समई फौजसुद्धां येत जावें. येणेंप्रों.

बंगाल्याचें कापड दरसाल सर-कारांत येत जावें. येणेंप्रों.